महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**, 28 Sept 2016

पंकज चव्हाण, ठाणे

मटा अँकर 'क्रायसिस' संस्थेचा अनोखा उपक्रम

# आदिवासी पाड्यांत सायकलची सैर

आदिवासी पाड्यांवरील मुलांना सायकलविषयी अतोनात प्रेम; पण इथे गरिबी पाचवीला पुजलेली. त्यामुळे दोनवेळच्या जेवणाची भ्रांत असताना सायकलसारखे वाहन कुठे घेणार, हा इथला सवाल. त्यामुळे सायकल शिकण्याची इच्छा असतानाही या मुलांना सायकल शिकता येत नाही. या मुलांची ही गरज लक्षात घेऊन, ठाण्यातील 'क्रायसिस' या सामाजिक संस्थेने येऊर येथील आदिवासी पाड्यांवरील मुलांसाठी 'सायकल लायब्ररी' हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाला मुलेही उत्तम प्रतिसाद देत असून सायकल शिकण्याचा आनंद मनमुराद लुटत आहेत.





गेली चार वर्षे ठाण्यातील आदिवासी पाड्यांवर ही संस्था काम करत आहे. या समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी धडपड करत आहे. येऊर येथील जांभूळपाडा, पाटीनपाडा, वनीचापाडा या तीन पाड्यांवरील मुलांसाठी ही सायकल लायब्ररी सुरू करण्यात आली आहे. ठाण्यातील अशोक नगर बिल्डिंग नंबर सात या सोसायटीच्या रहिवाशांनी त्यांच्याकडच्या सात टाकाऊ सायकली दुरुस्त करून या संस्थेला भेट दिल्या, शिवाय रिलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने नवीन चार सायकली दिल्यामुळे आजमितीस एकूण ११ सायकली संस्थेच्या 'सायकल लायब्ररी'त आहेत. ही मुले सकाळी अथवा सायंकाळी दोन तास सायकल शिकण्याचा सराव करतात. ज्या मुलांना सायकल येते, अशी मुले अन्य मुलांना सायकल शिकवतात. सायकलींची संख्या मुलांच्या संख्येपेक्षा नगण्य असल्याने समजूतदारपणे दररोज सगळ्यांना सायकल चालवता येईल, असे नियोजन येथील तरुण कार्यकर्ते करतात. अशा प्रकारे या 'सायकल लायब्ररी'चा फायदा या मुलांना होत आहे. आजही या मुलांना शाळेत जाण्यासाठी दोन किलोमीटर चालत प्रवास करावा लागतो. त्यामुळे या मुलांची ही पायपीट थांबवण्यासाठी अधिकाधिक दानशूर व्यक्तींनी सायकली दिल्या तर येथील मुलांची पायपीट थांबेल, असा विश्वास कार्यकर्त्या अपूर्वा आगवणे व्यक्त करतात.